## महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्युशन कं. लि.

## मोबाईल ॲपची मार्गदर्शक तत्वे

**भाग :- अ**

- मोबाईल वापरण्यासाठी मार्गदर्शक तत्वे :-
- इंटरनेट वापरण्यासाठी मोबाईल हॅण्डसेटचा इंटरनेट डाटा सक्षम असला पाहिजे.
  कर्मचारी ॲपवरुन घेतलेली माहिती थेट ऑनलाईन प्रणाली (System) एन.सी.एन.डी.एम.,ई.आर.पी. वर पाठवली जाते.
- मोबाईल ॲप हे भौगोलिक समन्वय ट्रॅक करते. म्हणजे वेगवेगळया स्तरावरील अक्षांश - रेखांश घेते. जी.पी.एस. मोबाईल हा जी.पी.एस. सुविधा ही मोबाईल हॅण्डसेटच्या सेटींगमधून चालू करता येईल.
- मोबाईल ॲपमधून कर्मचाऱ्यांची माहिती एच.आर.एम.एस. प्रणालीमधुन घेतली जाते. एच.आर.एम.एस. प्रणालीमध्ये सर्व विभागातील कर्मचाऱ्यांची सध्याची माहिती उपलब्ध असते
- ॲपचा वापर करुन मोबाईलच्या कॅमेऱ्यामधुन फोटो काढता येतो. व मोबाईलचा कॅमेरा चांगल्यादर्जाचा असला पाहिजे. (कमीत कमी ५ मेगापिक्सेल)
- सगळे ॲप इंग्रजी आणि मराठी भाषेत उपलब्ध आहेत. भाषा बदलण्यासाठी ॲपच्या होमस्क्रिनवर मराठी व इंग्रजी असे दोन पर्याय आहेत.
- आर.ए.पी.डी.आर.पी. पोर्टलचा उपयोग करुन युजर नेम / पासवर्ड वरुन ॲप ओपन होते. जरी आर.ए.पी.डी.आर.पी. पोर्टलवर युजर्स उपलब्ध नसेल (जनमित्र, यंत्रचालक) सी.पी.एफ. नंबर व डिफॉल्ड पासवर्डचा युजर्स करुन लॉगइन करता येते.
- मोबाईल ॲपद्वारे नॉन आर.ए.पी.डी.आर.पी. युजर्स आपला पासवर्ड बदलू शकतात. नॉन आर.ए.पी.डी.आर.पी. युजर्सचा पासवर्ड विसरला असेल तर संबधित कर्मचाऱ्याच्या अर्जावरुन स्थानिक आ.य.टी.सेंटर मोबाईल ॲपच्य वेब कन्सोलवरुन पासवर्ड रिसेट करुन देईल.
- अक्षांश आणि रेखांश घेण्या अगोदर जी.पी.एस. सर्व्हिस आणि मोबाईल डाटा नेहमी चालु असला पाहिजे. जेव्हा इंटरनेट ऑफलाईन असते. तेव्हा अक्षांश - रेखांश घेता येत नाही. अशावेळी घेतलेले रिडींग प्रक्रिया होण्याअगोदर रद्द होऊ शकते.
- सगळया क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ग्राहक मॅपींग, डि.टी.सी. आणि फिडर मॅपिंग डि टी.सी. बरोबर ग्राहक अगदी योग्य आहे याची खात्री करावी.
- मोबाईलॲपवरुन रोख आणि चेक कलेक्शसाठी उपविभागीय कार्यालयाचा कलेक्शन सेंटर कोड वापरावा.
- जरी नेटवर्क नसले तरी कर्मचाऱ्यांनी पाठविलेला डाटा मोबाईल ॲप स्टोअर करते आणि मोबाईल मध्ये स्टोअर झालेला डाटा नेटवर्क असल्यास अपलोड करता येते.

**भाग ब :-**

**अ) कर्मचारी मित्र ॲप :-**

हे ॲप कर्मचाऱ्यांना त्यांची दैनंदिन काम करण्यास उपयोगी येईल.

१) अक्षांश / रेखांश नोंदणी :-

– (अंक्षाश / रेखांश) नोंदणी ही म.रा.वि.वि.कं.ची मालमत्ता म्हणजेच म.रा.वि.वि.कं.ची कार्यालये उपविभाग फिडर आणि एच.टी. ग्राहक यांची भौगोलिक माहिती नोंद करते.

– हे अक्षांश / रेखांश SAP ERP मध्ये अपडेट केले जातात.

२) आउटेज मॅनेजमेंट :-

– नियोजित वीजपुरवठा बंद व ब्रेकडाउन यासाठी वीजपुरवठा बंदचा कालावधी इत्यादी माहिती फिडर प्रमाणे भरावी.
– कर्मचाऱ्याने अंदाजे बदं झालेला वीज पुरवठा व पुन्हा चालु होण्यासाठी लागणारा अंदाजित वेळ याची माहिती भरावी.
– मोबाईल ॲपवर नियोजीत वीजपुरवठा बंद होण्याऱ्या कालावधीची माहिती भरावी. वीजपुरवठा बंद होण्याच्य अगोदरच्या कालावधीत ग्राहकांना संदेश संबंधित (एस.एम.एस) पाठवला जाईल. जुने कालबाहय झालेल्या वीजपुरवठा बंद कालावधीची माहिती ॲपमध्ये भरु नये.
– वीज पुरवठा बंद कालावधीची एस.एम.एम. संबंधित फिडरच्या ग्राहकांना पाठवला जातो. जर वीज पुरवठा बंदचा कालावधी मोठा असेल व केव्हा सुरळीत होईल याचा एस.एम.एस वरीष्ठ अधिका-यांना पाठवता येईल.

३) लोड मॅनेजमेंट :-

– फिडरची पुर्ण लोड शिफ्टिंगची माहिती भरणे.
– हि सर्व लोड शिफ्टिंगची माहिती एन.डी.एम.सिस्टिमध्ये अपडेट होते.

४) फिडर मीटर रिडींग-

– सबस्टेशनच्या यंत्रचालकाला दर तासाला येणाऱ्या व जाणाऱ्या फिडरच्या रिडींगची माहिती ॲपद्वारे भरावी लागणार.
– दर तासाचे मीटर वाचन उदा : Kwh रिडींग, करंट आणि पी.एफ.
– मीटरचा फोटो सादर करण्याची सुविधा केली आहे. प्रत्येक दिवशी फक्त एक फोटो प्रत्येकी फिडर रिडींग घेऊन पाठवावा. दर तासाला घेतलेले रिडींग बीना फोटोचे सादर करावे.
– यामुळे फिडर वरील लोड पॅटर्न समजण्यास मदत होईल तसेच सब स्टेशनवरील वितरण हानी काढता येऊ शकेल.
– ऑफलाईन रिडींगची सुविधा आहे यामध्ये फिडरचे रिडींग हे मोबाईल उपकरणामध्ये साठवले जाते. तसेच नेटवर्क मिळाल्यानंतर रिडींग सर्व्हरला अपलोड होतात.
– मोबाईल ॲपवरुन अपलोड केलेले रिडींग हे दुसऱ्यादिवशी मोबाईल ॲपच्या वेळ कंन्सोलवर दाखवले जाते. जर अगोदरच्या भरलेले रिडींग चुकीचे असेल तर तारीख / वेळ निवडून तेच रिडींग पुन्हा दुरुस्त करता येते.

५) डिस्कनेक्शन मॅनेजमेंट :-

– कार्यक्षेत्रातीज देयक ग्राहकांची माहिती उपलब्ध.
– जर थकबाकीदार ग्राहक थकबाकी भरायला तयार असेल रोख किंवा चेक तर कर्मचा-याने ते पैसे गोळा करावे याची माहिती मोबाईल ॲपच्या कलेक्शनला भरावी.
– जर ग्राहक आपली थकबाकी जाग्यावर द्यायला तयार असेल रोख किंवा चेक तर कर्मचाऱ्याने ते पैसे गोळा करावे याची माहिती मोबाईल ॲपच्या कलेक्शनला भरावी.
– संबधीत ग्राहकाला पैसे भरल्यानंतर त्याच्या मोबाईलवर एस.एम.एस. मिळेल. म्हणजेच पैसे भरल्याची पोच मिळेल.
– प्रत्येक कर्मचाऱ्याने दैनंदिन गोळा केलेल्या पैशाचा अहवाल मोबाईल ॲपच्या कन्सोवर उपलब्ध असेल.
– लाईन स्टाफ व फिल्ड ऑफिसर यांनी गोळा केलेल्या रोख / चेक यांचा दैनंदिन हिशोब उपविभागातील सहाय्यक लेखापाल / विभागाती लेखापाल यांनी कराव्याच्या आहे.